Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५७ वे, अंक ११वा, मुंबई । जानेवारी २०२५
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 57, Issue : 11, Mumbai I January 2025
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

## प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा






देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५७वे, अंक ११वा,
जानेवारी २०२५
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह



**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९



अंकातील मजकूराशी मंडळ
सहमत असेलच असे नाही



दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in





कल्याण ब्राह्मण सभेतर्फे
महाराष्ट्रातील ब्राह्मण आमदारांचा सत्कार कार्यक्रम



पुणे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेचा ऋग्वेद भूषण पुरस्कार
संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते
ह.भ.प.योगीराज महाराज गोसावी (पैठणकर) यांना प्रदान करण्यात आला.



दिव्यांगधारा आणि सक्षम कोकण प्रांत या सामाजिक संस्थेचा
मध्यवर्ती मंडळातर्फे गौरव


MF
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
Relaxing Huts
Tamarind Umbrella
Toy Train
Pottery
Kids Play Area
Bullocart
Farm Visit 365 Days Bhutta Party Sept & Oct
Hurda Party Dec-feb Farm Tourisim 365 Days
Kitty Parties 365 Days Birthdays 365 Days
Get Togethers 365 Days Dairy Farm Visit 365 365 Days
Glamping 365 365 Days
Pre & Post Wedding Shoots
Agro Tourism For Schools & Corporates
Direct from FARM FRESH Vegetables & fruits at Your Doorstep on SAME DAY
For BOOKINGS Call:
70137 78442 | 97039 77724
Farm: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms
Just 30 mins Drive from Gachibowli & Hitech City

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM

**Ravindra Deshpande**

REC

**RASHMI**
**ELECTRICAL & CONTRACTOR**

Off. No. 2, Shree Siddhivinayak Commercial Complex,
Near Siddhivinayak Temple, Sector 10,
Airoli, Navi Mumbai 400708.
Mob. : +91 98330 71906, +91 98202 68478
Email : recprojects7@gmail.com

# संपादकीय

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ संस्था गेली ८७ वर्षे सामाजिक धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्य करीत असून शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक उपक्रम करीत आहे. गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक पारितोषिके देणे, आर्थिक सहाय्य करणे, परदेशी तसेच उच्च शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्ती देणे, सांस्कृतिक तसेच सामाजिक महोत्सव आयोजित करणे, महिलांच्या विविध समस्या बाबत चर्चासत्र अजित करणे, समाजातील गुणीजनांचा गौरव तसेच विविध क्षेत्रात स्पृहणीय कार्य करणाऱ्यांना पुरस्कार देणे इत्यादी उपक्रम मध्यवर्ती संस्था सातत्याने करीत आहे.

महाराष्ट्राच्या आणि देशाच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, धार्मिक व राजकीय इतिहासाच्या जडणघडणींना देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांनी हातभार लावलेला आहे. ब्राह्मण समाजाने इतरही समाजासाठी धर्मासाठी संस्कृती संवर्धनासाठी महत्तम योगदान दिलेले आहे. मध्यवर्ती मंडळाचे आजपर्यंत २५ अधिवेशने यशस्वी पार पडले असून दि. १२ व १३ नोव्हेंबर २०२२ मध्ये रौप्य महोत्सवी अधिवेशन बडोदा गुजरात येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या अधिवेशनास राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री व आताचे मुख्यमंत्री माननीय नामदार देवेंद्रजी फडणवीस उपस्थित होते.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार मासिकाद्वारे समाज जागृतीचे आणि प्रबोधनाचे कार्यदेखील उत्साहात सुरू आहे. समाजातील निष्णात थोरामोठ्यांचे विचार देखील लेखनाच्या माध्यमातून प्रकाशित केले जातात. समाजाचे संत एकनाथ महाराज आणि श्री समर्थ रामदास महाराजांचे विचार, साहित्य देखील प्रकाशित केले जाते. नाथांच्या आणि समर्थांच्या आध्यात्मिक व्यक्तिमत्त्वावर व त्यांच्या वांग्मयीन कार्यावर प्रकाश टाकणारे विविध अभ्यासकांचे लेख समाचार माध्यमातून प्रकाशित करण्याचा मानस आहे.

मध्यवर्ती संस्थेमार्फत अध्ययावत वाचनालय आणि अभ्यासिका देखील सुरू करण्यात आली असून सर्व समाजाने घ्यावा अशी अपेक्षा आहे. मुंबई बाहेरून येणाऱ्या सभासदांसाठी संस्थेच्या वास्तूत अल्प दरात तात्पुरती निवासाची व्यवस्था देखील नाममात्र दरात करण्यात आली आहे.

दिवसेंदिवस वाढणारे व न परवडणारे वैद्यकीय उपचार यासंदर्भात संस्था विचार करीत असून सभासदांसाठी वैद्यकीय विमा योजना सुरू करण्याचा संस्थेचा मानस आहे.

या सर्व शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक कार्यात प्रगती साध्य करण्यासाठी राष्ट्रहित डोळ्यासमोर ठेवून आपण सर्वजण कार्यरत राहू यासाठी आपले सर्वांचे सहकार्य आवश्यक आणि गरजेचे आहे.

**आपणा सर्वांच्या आग्रहाखातर अखिल देशस्थ ऋग्वेदी मध्यवर्ती मंडळ, मुंबई आणि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ कल्याण शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने लक्ष्मीनारायण वधु वर सुचक केंद्र घटस्थापनेच्या शुभ मुहूर्तावार कार्यान्वित झाले आह. ब्राह्मण जातीतील सर्व शाखीय वधू-वराची नोंदणी सुरू करण्यात आली आहे. यासाठी नाममात्र नोंदणी शुल्क रु १०००/- करण्यात आले आहे (लग्न जमेपर्यंत) यासाठी व्हाट्सॲप वर तसेच आपल्या समाचार अंकामध्ये स्थळासंबंधी माहिती प्रकाशित करण्यात येईल. वधू वर नोंदणी संबंधी फॉर्म्स संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. वधू-वरासंबंधी माहिती लक्ष्मीनारायण बाग बाळ गोविंदास मार्ग माहीम मुंबई ४०००१६ येथील मध्यवर्ती कार्यालयात उपलब्ध राहील.**

**दर शनिवारी आणि रविवारी कार्यालयीन वेळेत म्हणजेच दहा ते पाच या वेळेत इच्छुकानी संपर्क साधावा.**

**संपर्क : ०२२ २४३०७५७३. श्री जयंत देशमुख -९९३०४४५७२१, विजय चाव्हरे ९८३३७१७३५१**

# नुपेक्षी कदा रामदासाभिमानी भाग ८

**स.भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

**असे हो जया अंतरी भाव जैसा। वसे हो तया अंतरी देव तैसा।।**
**अनन्यास रक्षीतसे चापपाणी। नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।।३५।।**

उपनिषदांपासून संतवाङ्मयापर्यंत अनेक तत्त्वज्ञांनी यावर विचार मांडले आहेत की, जसा आपल्या अंतरी भाव असतो, तसा आपल्याला परमेश्वर वाटतो किंवा भेटतो. तसेच ज्यावेळी माणूस सर्व प्रकारच्या भीती, मोह, आणि शंका सोडून देवावर संपूर्ण विश्वास ठेवतो, तेव्हा देव त्याचे रक्षण करतो. हा विचार माणसाच्या आत्मिक उन्नतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण तो आपल्याला आपले जीवन अधिक सकारात्मक, शुद्ध आणि सार्थक करण्याची प्रेरणा देतो.

**अंतरीचा भाव महत्त्वाचा :**

आपल्या अंतरात्म्याचा भाव म्हणजे आपली वृत्ती, भावना आणि मानसिकता. प्रत्येक व्यक्तीच्या अंतरी असलेले विचार आणि भावना त्या व्यक्तीचे जीवन घडवतात. भगवद्गीतेतही भगवान श्रीकृष्ण म्हणतात की, यथा भावं तदा भवति – माणूस जसा विचार करतो, तसा तो बनतो. याच तत्त्वाला आधार देऊन आपल्या अंतरी असलेल्या भावावरच परमेश्वराचा अनुभव अवलंबून असतो.

भगवद्गीतेतील एक श्लोक आहे :

**अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।**

अर्थ : जो भक्त फक्त माझ्यावर विश्वास ठेवतो, त्याची प्रत्येक गरज आणि रक्षण करण्याची जबाबदारी मी घेतो.

जर आपल्यामध्ये श्रद्धा, प्रेम, सहिष्णुता आणि समर्पणाचा भाव असेल, तर परमेश्वराचे स्वरूपही आपल्याला प्रेममय आणि सहिष्णु वाटते. दुसरीकडे, जर आपल्यामध्ये संशय, क्रोध किंवा अहंकार असेल, तर आपण परमेश्वराच्या अस्तित्वाची अनुभूती घेण्यात अडखळतो.

**अनुभवाचा दृष्टिकोन**

आपल्या अंतर्मनात असलेल्या भावनांचे प्रतिबिंब बाह्य जगात दिसून येते. जसे :

१. श्रद्धेचा भाव : जो परमेश्वराला श्रद्धेने पाहतो, त्याला सर्वत्र ईश्वराचा अनुभव होतो. संत तुकाराम यांनी म्हटले आहे, जगी सर्व सुखी असा कोण आहे? विचाराता एक मिळे दुःख पर्वताए। ते आपल्या भावनांवरच लक्ष केंद्रित करण्याचे महत्त्व सांगतात.

२. निर्मळता : संत ज्ञानेश्वरांनी आपुलिया हृदयीं पाहे ब्रह्मा, असे सांगून मनाची शुद्धता आणि निर्मळ भाव ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

३. अहंकाराचा अभाव : अहंकार आणि आत्मशुद्धीच्या अभावामुळे परमेश्वराचा अनुभव घेणे कठीण होते. केवळ विनम्रता आणि समर्पणानेच ईश्वराला अनुभवता येते.

अध्यात्मात, अंतरी भाव हा केवळ विचार नाही तर जीवन जगण्याचा मार्ग आहे. भक्तिसंप्रदायात संतांनी हे स्पष्ट केले आहे की, भक्तांच्या भावानुसारच परमेश्वर त्यांच्या आयुष्यात प्रकट होतो. रामायणातील शबरीच्या भक्तीचे उदाहरण यासाठी प्रसिद्ध आहे. शबरीचा निर्मळ भाव आणि समर्पण पाहून भगवान श्रीराम तिला भेटण्यासाठी तिच्या कुटियेत गेले.

श्रीकृष्ण आणि अर्जुनाच्या संवादातूनही आपण शिकतो की, भक्तांच्या विश्वासावर आणि भावनेवरच ईश्वराची कृपा अवलंबून असते. अर्जुनाच्या भक्तीमुळे कृष्णाने गीतेच्या माध्यमातून त्याला आत्मज्ञान दिले.

आजच्या धकाधकीच्या जीवनात आपले अंतरी भाव सकारात्मक ठेवणे ही एक गरज बनली आहे. जर आपण संतुलित आणि शुद्ध भाव टिकवून ठेवू शकलो, तर आपल्या जीवनातील अडचणींचा सामना करण्यासाठी परमेश्वराची कृपा आपल्याला साथ देईल.

मनःशांतीसाठी साधना : ध्यान, योग आणि प्रार्थना यामुळे आपल्याला आपला भाव निर्मळ ठेवता येतो.

समर्पणाचा भाव : आपले अहंकार बाजूला ठेवून परमेश्वरावर संपूर्ण श्रद्धा ठेवणे आवश्यक आहे.

परस्पर प्रेम : जेव्हा आपण इतरांवर प्रेम करतो, तेव्हा आपण अप्रत्यक्षपणे परमेश्वरावर प्रेम करतो, कारण ईश्वर सर्वत्र आहे.

परमेश्वराला अनुभवण्यासाठी आपला अंतरी भाव शुद्ध आणि सकारात्मक असावा लागतो. जसा आपण विचार करतो, तशीच आपल्याला अनुभूती मिळते. जर आपण परमेश्वराला प्रेम, श्रद्धा आणि समर्पणाने पाहिले, तर तो आपल्याला त्याच स्वरूपात भेटतो. जीवनातील प्रत्येक प्रसंगाला ईश्वराचे वरदान मानून आपण त्याच्यावर विश्वास ठेवला, तर आपले जीवन अधिक आनंदमय आणि समृद्ध होईल.

**भारतीय गणराज्य दिनाच्या आणि मकर संक्रांतीच्या**
**सर्व ज्ञाती बांधव-भगिनींना, सभासदांना, देणगीदार, जाहिरातदारांना**
**हार्दिक शुभेच्छा!**


**JV MARKETING & INVESTMENTS**
*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande*
*MBA - Marketing*
*+91 98330 25031*
*jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*
*MahaRERA ID - A51900028785* *@jvmarketing18* *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

# संलग्न संस्था वृत्त

*** पुणे :** परमार्थ आणि संसाराची एकरुपता साधत प्रबोधन करण्याचे कार्य संत एकनाथ महाराजांनी अतिशय प्रतिकूल काळात केले. ते आजही मोलाचे आहे, असे प्रतिपादन शांतीब्रह्म संत एकनाथ महाराजांचे १४वे वंशज ह.भ.प.योगीराज महाराज गोसावी (पैठणकर) यांनी केले. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेचा ऋग्वेद भूषण पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते रविवारी प्रदान करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्याध्यक्ष जयंत देशपांडे, तसेच विश्वस्त श्रीमती सुनिता तावरे, श्रीमती सुलभा शिरगावकर उपस्थित होत्या. या पुरस्कारा खेरीज सवाई गंधर्वाच्या कन्या कै. प्रमिलाताई वसंत देशपांडे स्मरणार्थ देण्यात येणारा संगीत पुरस्कार जयदीप वैद्य, कै.सरदार आबासाहेब मुजुमदार स्मरणार्थ देण्यात येणारा समाज भूषण पुरस्कार महाराष्ट्र ब्राम्हण सभा, पुणे या संस्थेस, तर ऋग्वेद पुरस्कार वेदमूर्ती श्रीनिधी स्वानंद धायगुडे तसेच विज्ञान संशोधन अभ्यासक पुरस्कार डॉ. आमोद साने, आदर्श स्थापत्य शास्त्रज्ञ पुरस्कार विक्रम हुंडेकर, इतिहास संशोधन, साहित्य पुरस्कार महेश मंगेश तेंडूलकर, आदर्श समाज सेवा पुरस्कार रघुनाथ ढोले, सर्वोदय पुरस्कार चंद्रशेखर जोशी यांना देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी यांनी केले, सरचिटणीस अनिल पानसे यांनी आभार मानले, संस्थेचे मुख्य चिटणीस सुनील पारखी यांनी सूत्रसंचालन केले.

*** कल्याण :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ कल्याण यांच्या सहकार्याने ब्राह्मण सभा कल्याण शाखेतर्फे विधानसभा निवडणुकीत राज्यातून विविध मतदार संघातून निवडून आलेल्या ब्राह्मण ज्ञातीतील आमदारांचा सत्कार कार्यक्रम कल्याण येथील अत्रे रंग मंदिरात रविवारी आयोजित केला होता. त्यावेळी सज्जनगड येथील श्री रामदास स्वामी संस्थानचे भूषण महारुद्र स्वामी महाराज, भारतीय जनता पक्षाचे आमदार संजय केळकर, बोरीवलीचे आमदार संजय उपाध्याय, सांगलीचे आमदार सुधीर गाडगीळ, राजापूरचे आमदार किरण सामंत, परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले, आमदार कुमार आयलानी, भाजप नेते माधव भंडारी ब्राह्मण सभेचे अध्यक्ष मुकुंद बापट आणि इतर मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते.

ब्राह्मण घटकांकडून केवळ ज्ञाती विकासापुरते काम न करता विविध स्तरातील समाजाच्या विकासासाठी काम केले जात आहे. ज्ञाती प्रश्न नागरी विकासाची कामे करताना जात पात धर्म पाळला जात नाही. दूरगामी विचारातून समाज विकासाबरोबर राष्ट्र विकास साधला जाणार आहे. त्या दिशेने देशाची पावले पडत आहेत अशी मते रवि वारी येथील ब्राह्मण सभा शाखेतर्फे आयोजित ब्राह्मण समाजातील नवनिर्वाचित आमदारांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली.

# आरोग्यवाणी

**डॉ. नीरज रायते (मो. : ९९२२४२७०६७)**

सुजाण वाचकहो,

आजपासून आपण एका नव्या आरोग्यपर्वास सुरुवात करीत आहोत. आपल्याला आरोग्याविषयी नव्या जाणिवा करुन देण्याचा एक प्रयोग म्हणून हा आरोग्ययज्ञ सुरु करीत आहोत.

मित्रांनो, आपण आजारी पडल्याशिवाय निरोगी असण्याचं........ आपल्याला कळत नाही, जाणवत

नाही. (आजारी पडल्यानंतर डॉक्टर आपल्या आजाराचे निदान कसे करतात? चाचण्या का करतात? उपचार काय करतात? आपला आजार किती गंभीर आहे? तो आपल्यालाच का झाला? आपण पूर्ण बरे होऊ की नाही? आपल्यामुळे इतरांना हा आजार होईल का? त्याचे प्रतिबंधन कसे करता येईल? असे एक ना अनेक प्रश्न आपल्यापुढे उभे राहतात. अशावेळी योग्य मार्गदर्शन झाले, दिलासा मिळाला आणि आपण त्या अवघडलेल्या स्थितीतून बाहेर पडलो की, हायसं वाटतं, 'सुटलो बुवा एकदाचे' असं होऊन जातं!

जगात अशी थोडीच माणसं आहेत की, ज्यांना आयुष्यात कुठलाच आजार झाला नाही. सर्दी, पडसं, खोकला, ताप, डोकेदुखी, पाठदुखी, जुलाब, उलट्या, अपचन, धडधड, दमछाक, अशक्तपणा, निद्रानाश अशी छोटी-मोठी दुखणी आपण किंवा आपल्यापैकी अनेकांनी कधीतरी अनुभवली असतीलच. तात्पुरत्या आणि सुयोग्य प्राथमिक उपचारांनी अणि कधी कधी औषधही न घेता हे किरकोळ आजार बरे देखील होतात. पण काही काही आजार मात्र आयुष्याचे सोबती असतात. जीवनभर आपली साथ करणारे मधुमेह, अतिरक्तदाब, सांधेदुखी, दमा, ॲलर्जी, हृदयविकार यासारखे आजार कधी कमी, कधी जास्त होतात. खट्याळ नवरा किंवा अवखळ बायको यांच्यापासून घटस्फोट घेता येतो, पण या दीर्घकालीन आजारांपासून सुटका होत नाही. या आजारांना सांभाळून घ्यावे लागते. आपण अक्षरशः वैतागतो, कंटाळून जातो, पण कंटाळा केल्याने, त्रागा केल्याने का प्रश्न सुटतात? अशा असाध्य, प्रदीर्घ आजारांविषयी माहिती घेऊन त्यावर उपचार झाल्यास जीवन सुसह्य होते. परिस्थितीचा स्वीकार करुन, स्वयंसिद्ध होऊन परिस्थितीला सामोरे जाणे एवढाच एकमेव उपाय आपल्या हाती असतो. अशावेळी आपले डॉक्टर योग्य मार्गदर्शन करुन आपल्याला व्याधिमुक्त करण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांच्या प्रयत्नांना धडपडीला योग्य तो प्रतिसाद देणं हे मात्र आपलंच काम असतं! डॉक्टर काय उपचार करणार आहेत याचंही आपल्याला कुतूहल असतं आणि तशी उत्सुकता असणं पण साहजिकच आहे, नैसर्गिक आहे, पण जाणीवपूर्वक माहिती करुन घेणारे रुग्ण थोडेच! रुग्णांची प्रचंड गर्दी, वेळेचा अभाव आणि व्यस्त डॉक्टर यामुळे आपली उत्सुकता खूपच ताणली जाते, अन् सुयोग्य माहितीअभावी भलतंच घडतं. रुग्ण आणि डॉक्टरांचे स्नेहाचे संबंध त्यामुळे ताणले जातात.

हल्ली रेडिओ, वर्तमानपत्रे, जाहिराती, टी.व्ही. अशा माध्यमांतून आरोग्य विषयावर खूप माहिती मिळते. अशी माहिती अनेकवेळा आपल्याला लागू पडतेच असे नाही. प्रत्येक रुग्ण हा भिन्न असतो. त्यांचे स्वभाव वेगवेगळे असतात. रेडिओ, वर्तमानपत्रांतून मिळालेल्या किंवा सांगोपांगी मिळालेल्या सल्ल्यानं आपलाच गोंधळ उडतो. 'वाजे पाऊल आपुले सारखं छातीत दुखतंय' या नाटकात असा मानसिक गोंधळ उडालेल्या रुग्णाचे उत्कृष्ट चित्रण झाले आहे. 'निमहकीम, खतरे जान' अशी एक म्हण आहे. अर्धवट माहितीमुळे, घरच्या घरी किंवा अशास्त्रीय उपचार घेतल्यामुळे रुग्ण बरा व्हायच्या ऐवजी दगावतो, असा अनुभव अनेकांना येतो. केमिस्टच्या दुकानातून डॉक्टरी प्रिस्क्रिप्शनशिवाय, 'ॲक्रॉस द काऊंटर' औषधे घेण्याऱ्यांची संख्या काही कमी नाही. औषध कसे घ्यावे! कितीदा घ्यावे! किती दिवस घ्यावे! जेवणाआधी घ्यावे की नंतर? याविषयी डॉक्टरांकडून माहिती करुन घेणे हा रुग्णाचा हक्क आहे. Drugs are potential poisons! हा मंत्र लक्षात ठेवावा. औषधे ही दुधारी शस्त्रे आहेत. ती तारकही असतात, मारकही असतात. म्हणूनच अनुभवी, कुशल, ज्ञानी डॉक्टरांच्याकडूनच उपचार करुन घ्यावेत. डॉक्टरी सल्ल्याशिवाय औषधे घेणे केव्हाही धोक्यांचेच! हे लक्षात घ्यायला हवे.

# आपल्या पूर्वजांचे कर्तृत्व व पुण्याई

**प्रभाकर कुलकर्णी (कार्याध्यक्ष)**

नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मी सुट्टी निमित्त केनिया येथे जाऊन ४ डिसेंबर २०२४ रोजी मुंबईत परतलो. विमानातून उतरून मुंबई विमानतळाच्या लॉबीमध्ये प्रवेश करताच माझा फोन खणखणला ज्यावरचा नंबर अनोळखी होता त्यामुळे मी थोडासा सावध झालो कारण आजकाल अनोळखी कॉलला प्रतिसाद देण धोक्याचा असत परंतु उत्सुकतेने मी परत त्या नंबरवर त्या व्यक्तीशी संपर्क साधला असता मला सुखद अनुभव आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने मी सुहास देशपांडे मी पुण्यावरून बोलत आहे अशी ओळख करून दिली आणि त्यांचे बंधुराज श्री. श्रीष देशपांडे हे मुंबईत अमेरिका वरून आले असून आपल्याला ६ डिसेंबरला भेटू इच्छितात अशी विनंती केली. त्यांनी एवढचे सांगितले की आपल्याला संस्थेला ते देणगी देऊ इच्छितात.

बोलणे झाल्याप्रमाणे मी दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी श्री. श्रीष देशपांडे यांना भेटण्यासाठी हॉली डे इन मध्ये सकाळी ९.३० वाजता पोहोचलो. तिथल्या लॉबीमध्ये श्रीष देशपांडे माझी वाट बघत होते. मी त्यांना भेटून माझी ओळख करून दिली त्यावेळी त्यांनी मला सांगितले की आपल्या संस्थेने म्हणजेच अखिल देशस्थ ऋग्वेदी बाह्मण मध्यवर्ती मंडळाने १९७५ साली त्यांना परदेश शिक्षणासाठी ५००/- रूपयांची कर्जाऊ शिष्यवृत्ती दिली होती. त्याची परत फेड मी केली असून त्यांना आता ३ लाख रूपये देणगी द्यावयाचा आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून त्याचा विनियोग करण्यात यावे. त्यांनी मला १९७५ सालचे त्यांना संस्थेने दिलेले शैक्षणिक कर्ज मंजूर पत्राची प्रत दिली. आणि त्यावर आपल्या संस्थेचे माजी कार्यवाह प्राध्यापक कै. अनंत सुरू यांची सही आहे. मला नमूद करण्यास आनंद वाटतो की त्याकाळात माझे वडील कै. पाडुरंग विनायक कुलकर्णी हे ही त्याच्या बरोबर कार्यवाहपदी कार्यरत होते. त्यांनी त्या पत्राबरोबर मला ॲक्सस बँकेचा रूपये ३ लाखाचा धनादेश सुपूर्त करताना सांगितले की, हा धनादेश आजच बँकेत जमा करून मला त्यांची पोच द्यावी. त्यानुसार तो धनादेश बँकेत जमा करून त्यांना त्यांची पोच देण्यात आली आहे. त्यांनी हे ही सांगितले की रूपये ३ लाखांचा धनादेश म्हणून देशस्थ ऋग्वेदी शिक्षणोत्तेजक संस्था पुणे यांना ही दिला आहे.

डॉ. श्रीष देशपांडे हे पी.एच.डी असून ते Knauss School of Business University of San Diego येथे Finance (अर्थव्यवस्था) या विषयाचे प्राध्यापक म्हणून गेली ५० वर्षाच्यावर काम करत आहेत. त्यांनी बोलताना सांगितले की कोरोना माहामारी नंतर मी आजच भारतात आलो आहे. त्यामुळे ही देणगी देण्यास उशीर झाला.

डॉ. श्रीष देशपांडे यांना भेटल्यानंतर मला अतिशय आनंद झाला आणि आपल्या पूर्वजांनी, माझी विश्वस्तांनी केलेल्या कार्याबद्दल किती कृतज्ञता व्यक्त करावी याबद्दल संभ्रम निर्माण झाला. आपल्या पूर्वजांनी आपल्या संस्थेत केलेल्या शैक्षणिक मदतीव्दारे गेली ५० वर्षापासून अनेक विद्यार्थ्याचा उत्कर्ष झाला आहे आणि त्यातील लाभार्थी विद्यार्थी/विद्यार्थीनी देशात आणि विदेशात कार्यरत आहेत यांचा आपला सर्वांना अभिमान असला पाहिजे. त्या ही पेक्षा जास्त म्हणजे या सर्व लाभार्थी विद्यार्थी/विद्यार्थीनी मध्यवर्ती मंडळाने केलेल्या शैक्षणिक मदतीची जाण ठेवून कृतज्ञता दर्शवली आहे. आणि त्याच फलित म्हणजे संस्थेच्या नावे जमा असलेली गंगाजली (Fixed Deposit) ज्याच्या व्याजातून गेली अनेक वर्ष समाजातील हुशार व गरजू विद्यार्थी/विद्यार्थीनी शैक्षणिक मदत देत आलो आहोत. या सर्वांचे आपल्या संस्थेवर उपकार आहेत आणि या सर्वाच्या भावी आयुषासाठी आम्ही आमच्या शुभेच्छा देतो.

खंत एवढीच आहे की, उच्च शिक्षणोत्तर परदेशी जावू इच्छिणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनी कडून योग्य पात्र अर्ज आम्हाला पात्र अर्ज आम्हाला प्राप्त होत नसल्याने संस्थेची इच्छा असून सुध्दा संस्था उच्च शिक्षणातार्थ जाणाऱ्या शैक्षणिक मदत देऊ शकत नाही.

एवढच सांगायचे आहे की आपल्या पूर्वजांनी, माझी विश्वस्थांनी निर्माण केलेल कार्य आम्ही सांभाळणे एवढच काम करू शकतो त्यामध्ये आणखी भर टाकण्याचे काम हे आपल्या सर्वाचे आहे.

तरी त्यासाठी आपल्या सर्वाना ज्ञात असलेल्या ज्या लाभार्थी विद्यार्थी/विद्यार्थीना परदेशात शिक्षण घेण्यासाठी कर्ज घेतले होते त्यांची नावे पत्ते आम्हाला कळविल्यास भविष्यात जास्तीत जास्त विद्यार्थी/विद्यार्थीनीना कर्ज रूपी साहाय्य करता येईल.

आपल्याकडून योग्य प्रतिसादाची वाट पाहत आहोत.

## ऋणानुबंधाच्या गाठी

**ज्योत्स्ना मुळावकर**

नातं म्हणजे, जिव्हाळा, प्रेम, आपुलकी. काही नाती ही जन्मताच मिळालेली असतात, ती रक्ताची नाती. आपले आई-वडील, आजी-आजोबा, आपली भावंड, आपली मुलं आणि मग नंतर येणाऱ्या सुना, जावई, नातवंड, अशी कौटुंबिक नाती आपण जपतो प्रेमाने फुलवतो, जोपासतो, जबाबदारीने निभावतो. पण काही आपण निर्माण केलेली, मानलेली नाती असतात. नात्यांमध्ये सहजता स्वाभाविकता असली की नातं फुलत जात. तिथे एकमेकांशी आपले सूर जुळतात. विश्वास हा या नात्यांचा पाया असतो. नात्यांमध्ये गरीब-श्रीमंत, जात-पात, कुठलाही भेदभाव येता कामा नये. आपल्या माणसावर अगदी आपण जीव ओवाळून टाकला



Protect Capital & Create Wealth.....
JAYANT DESHMUKH
B.COM. CAIIB DBM
Insurance & Investment Consultant
LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund
M. : 9930445721 / 9702837022
Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured....

STAR Health Insurance
Personal & Caring
The Health Insurance Specialist

पाहिजे. अनेक नाती अजरामर झाली आहेत. राधा-कृष्ण प्रेम, कृष्ण-सुदामा मैत्री, राम- लक्ष्मण बंधुत्व, संत निवृतीनाथ - संत ज्ञानेश्वर गुरू शिष्य, असच एक उदाहरण ज्यावेळी कृष्णाच्या बोटाला रक्ताची धार लागली, ती पाहताच पुढचा मागचा विचार न करता द्रौपदीने भरजरी शालू फाडून, कुष्णाच्या बोटाला बांधला.

''भरजरी ग पितांबर दिला फाडूनी, द्रौपदीसी बंधू शोभे नारायण'' हे आहे नात्यातलं प्रेम. दुर्गा भागवत आपल्या कृष्णावरील लेखात म्हणतात कृष्णा, तू द्रौपदीचा सखा झालास. हे सुंदर नातं, तू भारतीय स्त्रीला दिलस. तुझ्या आधी स्त्रीचा मित्र ही संकल्पनाच नव्हती. तो स्त्रीचा पिता, पती किंवा पुत्र असावा, अशी समाजाची संकल्पना होती.

स्त्री पुरूष यांच्यातील मैत्री भावनेवर थोर कवियत्री इंदिरा संत आपल्या 'दीपवा' कवितेद्वारे ते नातं शोधू पाहतायत. त्या म्हणतात गच्च भरून आलेले आभाळातील ढग मधूनच जरा बाजूला सरून दीपवा सांडावा तसं येणं, खिडक्या, कौलारातून, शिंतडणाऱ्या बाहेरील झिम्म पावसाच्या तुषारांचे सुखद शहारे, तस तुझ असण गारठलेल्या हवेत शाली पांघरून घ्यावा, तस आपलं बोलणं, जिव्हाळयाचं, सुखदुःखाचं, अडीअडचणीच, कसल्या कसल्या बेतांचं, थट्टेच्या खळखळाटांचं, नेहमीच्या दुखण्याचं आणि मृत्यूचही. ऊन पावसाच्या या आरसपानी उत्साहातून, माझ्या मनात धरलेली एक संतत धार. असा हा भाऊ आहे की मित्र आहे की तो पंढरीचा सखा सावळा आहे? हे त्या या कवितेतून शोधत आहेत. पण तो कोणीही असला तरी सतत पाठीशी भक्कम आधार देत राहावा, हीच इच्छा.

पु. ल. देशपांडे म्हणतात, ''रोज आठवण यावी असं काही नाही, रोज भेट व्हावी असेही काही नाही, एवढेच कशाला रोज बोलणं व्हावं असंही नाही, पण मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री आणि तुला त्याची जाणीव असणं हीच झाली मैत्री.'' यापेक्षा मैत्रीची निराळी व्याख्या ती काय असणार. असं मैत्रीच हे नातं आपल्याला श्रीमंत करून जात. कुसुमाग्रज म्हणतात, ''नात्यास नाव अपुल्या, देऊ नकोस काही'' पण ते नातं जप. एकदा हा रेशीम बंध निर्माण झाला की त्याला नावाची गरजच नाही. असा हक्काचा कोपरा असावा, जिथे आपण आपल्या मनातलं सगळं बोलू शकू, कधी कधी तर न बोलताही त्याला सगळं कळावं. कुठे काही आपलं चुकत असेल, तर तपासून पाहता यावं. निर्मळ मनाने आपल्या चुका स्वीकारून आणि सुधारून पुढे जाव. तुम्हाला सापडत आहे का कोणी असं मग त्याला जपा, त्याच्या अडीचणीला धावून जा, त्याला आधार द्या, त्याला भेटत राहा, अगदी नाहीतर फोन करत जा. कारण संवाद महत्त्वाचा. नातं हे मायेच्या ओलाव्याने बहरतं. त्याचा सुगंध अत्तर कुपीत जपून ठेवा. मन उदास होताच तो सुगंध तुम्हांला नवचैतन्य देईल. या घ्णानुबंधाच्या गाठी असतात, त्यांच्या भेटीत तुष्टता मोठी असणारच. तेंव्हा असं नातं आयुष्यभर फुलावं, अखंड नंदादीपासारखं तेवत राहावं, तुमच्या जीवन वाटा त्या प्रकाशाने उजळून निघाव्यात, याच शुभेच्छा!

## व्यक्तिगत आणि सामाजिक स्तरावर ज्येष्ठांच्या स्थितीत सुधारणा होण्यासाठी काय करावे?

**श्रीमती विजया पांडुरंग कुलकर्णी** (मो. : ९८७०००८१७८)

भारतीय संस्कृती सर्व जगात अप्रतीम संस्कृती मानली जाते. भारतीय संस्कृतीला सबंध जगात तोड नाही, स्वामी विवेकानंदानी आपल्या संस्कृतीची मुहूर्त मेंढ अमेरीकेत रूजवली. भारतीय संस्कृतीचा पाया एकत्र कुटुंब संस्थेत निर्माण झाला. त्यावेळी कुटुंबात वयस्कर माणसांना मानाचे सन्मानाचे स्थान होते. आज कमी जास्त प्रमाणत आहे. कुटुंबात वयस्कर म्हणजे म्हाताऱ्या माणसांचे वर्चस्व बडे प्रस्थ मोठे होते. विज्ञान युगामुळे व

विभक्त कुटुंब पद्धतीमुळे वय झालेल्या व्यक्तीला हवा तसा मान सन्मान मिळत नाही, लहान जागा यामुळे मनाचा कोडमारा होतो. दुसरे म्हणजे सुशिक्षित पदवीधर मुलां – सुना बरोबर मतभेद होतात. विज्ञान युगामुळे घरात नवीन यंत्र सामुग्री, ह्यामुळे त्यांच्या सहवासात घरांत प्रेमाने वागणे बोलणे होत नाही. मन जुळवून, काळ घालवणे कठीण जाते. मन जुळावयास एकमेकांचा सतत सहवास हवा. वामनराव पै. म्हणतात मुलगा बापाच्या सहवासात संपर्कात आला नाही, मग प्रेम आपुलकी जिव्हाळा कसा उत्पन्न होणार. म्हातारपणाचे फायदे हवे असतील तर वयस्कर माणसाचे मन, बुद्धी, शरीर निरोगी हवे. मन निरोगी असेल तर घरातील माणसांच्या दोषावंर मात करता येईल. म्हातारपण येणार हे समजुन वयाच्या पंच्चावन्न वर्षापासुन मन, बुद्धी, शरीर निकोप ठेवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. षड्‌रिपु ताब्यात ठेवले पाहिजे. लोभ, मोह, मत्सर, क्रोध, व्देष, स्वार्थ अंहकार हे ते रिपु छोट्या छोट्या प्रसंगातून डोक वर काढतात. त्यावेळी रिपुवर अकूंश ठेवला पाहिजे. मन शुद्ध तुझं गोष्ट हाय पृथ्वी मोलाची तू चाल गडया तुला भिती कशाची, ह्या काव्य पंक्ती ध्यानात घ्याव्या. वयस्कर एकटी असतात तेव्हा त्यानी मनामध्ये देवाचे नाम स्मरण करावे. स्तोत्र पाठ असतील तर ती म्हणावीत. मनाचे श्लोक रोज म्हणावे. त्यांनी मनाची शांती ढळत नाही. मनात चांगले विचार येण्यासाठी थोरामोठ्यांची चरित्र वाचावी. त्यांच्या आयुष्याचा कालखंड आठवावा. रिकामे मन सैतानाचे घर होवू देवू नये. बुद्धीसाठी नातवंडाना शिकवावे, आपल्या सोसायटीच्या मध्ये नातवंडाच्या वयाची मुलं असतील, त्यांना शिकवावे. बुद्धी, मन ह्यांना सतत चांगल्या कार्यात गुंतुन ठेवावे. आपण ज्या सोसायटीत रहाता, तेथील आपल्या वयाच्या माणसाना मित्र म्हणून जवळ करावे, त्यांच्या बरोबर सर्व मित्रत्वाचे सबंध ठेवावे. त्यांच्या बरोबर सर्व विषयांवर चर्चा करावी उदा. सोसायटीची कार्य पद्धत ज्येष्ठांचा संघपरिवार, वर्तमान पत्रातील अग्रलेख इत्यादी. सुना शिक्षणमुळे आर्थिक परिस्थिती, ह्यामुळे नोकरी करतात त्यांना मदत म्हणून ज्येष्ठांनी बाजारहाट करावा. लाईट, टेलीफोन ही बिल भरावी वयस्करानी बाहेर जाताना पाण्याची बाटली, मोबाईल, कोरडे पदार्थ घेवून जावे. गरज वाटली तर सोबतीला मित्राला बरोबर घ्यावे. जो सक्षम असेल, मुलांनी जागा लहान असेल तर आपल्या वसाहतीत त्यांना जागा घेवून द्यावी, आई वडिलांच्या मदती साठी दिवसभर बाई ठेवावी, सकाळी मुलानी आई वडिलांना भेटून त्यांना काय हवे काय नको ते विचारावे. संध्याकाळी सुनेनी येऊन चौकशी करावी, सुना, मुल ह्यांना नोकरीच्या कामाचा ताण असतो. उच्च अधिकाऱ्याची कमी जास्त भाषा ऐकावी लागते. त्यामुळे कुटंबानी जाण ठेवून वृद्धांची सेवा करावी, ह्यासाठी वडाच्या प्रमुख झाडाला पारंब्या जसा आधार देतात तसा द्यावा. दर महिन्याला डॉक्टरला बोलावून ज्येष्ठांची प्रकृती दाखवून औषध उपचार करावे, डॉक्टर वसाहतीत असेल त्यालाच दाखवावे, टेलीफोनव्दारे काळवेळ ठरवता येतो. दुसरे समाजात वृद्धाना सर्व तरूणानी मदत करावी. बसमध्ये जागा द्यावी, ओझ असेल तर ते उचलावयास मदत करावी. समाजात कार्यक्रम असेल तर पुढे बसण्याची व्यवस्था करावी. दुसरे हल्ली समाजात इतर सामाजाचे वृद्ध एकटे असतील तर तीन चार वृद्धानी एखाद्या वृद्धाकडे राहुन एकत्र जीवनव्यतीत करावे. त्यावेळी कामाला बाई दिवसभर तरूण मुलगा ह्याना ठेवून रहावे, इतर काम वाटून घ्यावी, पैशाचा हिशोब चोख ठेवावे. संत सांगतात चांगल बघा, चांगल बोला, पायाखाली बघून चाला, हातानी चांगल काम करा व प्रेम द्या प्रेम घ्या. वसाहतीत बालवाडी, पाहणाघर असेल तर त्या चालकांची परवांनगी घेवून लहान मुलांमध्ये खेळ गप्पागोष्टी करा. त्यांना बिस्किट व इतर खाद्यपदार्थ चालकांच्या परवांनगीने द्या कारण ज्येष्ठतव म्हणजे दुसरे बालपण असते. वयस्कर स्त्रीयांनी सुद्धा तीघी चौघीनी एखाद्या वयस्कर स्त्रीच्या घरी राहून आयुष्य व्यतीत करावे. कोणीही मनुष्य सर्वगुण संपन्न नसतो. प्रत्येकातील दोष सांभाळून आंनदाने काल, करूणा करावी, हे करताना प्रत्येकाच्या प्रकृतीची काळजी घ्यावी. सर्वे सुखीना सन्तु सर्व संन्तु निरामय.

ता.क. वृद्धाना वृद्धाश्रमात सुद्धा सर्वांशी पटवून घ्यावे लागते. आपल्या मनाप्रमाणे सर्व होईलच असे नाही. योग शिकावे, जेणे करून मन व शरीर पाहून हसत खेळत आयुष्य व्यतीत करता येईल.

# जोडीदार निवडा

**वर पाहिजे ..........................................................................................**

✻ **स्वप्ना मुकूंद रिसालदार (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख** : १६/०५/१९९६, **जन्म वेळ** : दुपारी ०१.२८ **जन्म ठिकाण** : मुंबई, **उंची** : ५.४, **रक्तगट** : बी (+), **गोत्र** : जमदग्नी वत्स, **रास** : मेष, **नक्षत्र** : भरणी, **नाडी** : मध्य, **गण** : मनुष्य, **शिक्षण** : एम. कॉम, **नोकरी/ व्यवसायः** खाजगी बँक, **मासिक उत्पन्न** : ३०हजार, **अपेक्षा** : नोकरी करणारा व मुंबईत रहाणारा असावा, **संपर्क** : ९८६९११७९७१

✻ **तनया मंगेश कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख** : २१/११/१९९८, **जन्म वेळ** : पहाटे ०१.२९, **जन्म ठिकाण** : अंबरनाथ, **उंची** : ५.४, **रक्तगट** : ओ (+), **गोत्र** : विश्वामित्र, **रास** : वृश्चिक, **नक्षत्र** : जेष्ठा, **नाडी** : आद्य, **गण** : राक्षस, **शिक्षण** : बी.ई. एम एस. (युएसए), **नोकरी/ व्यवसायः** खाजगी इंजिनियर,(यु एस ए) **वार्षिक उत्पन्न** : ७० हजार डॉलर, **अपेक्षा** : अमेरीकेत राहणारा, सुस्थीत, अनूरूप, **संपर्क** : ९८६७४३३१५२/ ९८६९३९२९३१

✻ **स्नेहल चंद्रशेखर पाटील (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख** : १९/०१/१९९५, **जन्म वेळ** : सकाळी ०६.५८, **जन्म ठिकाण** : मुंबई, **उंची** : ५, **रक्तगट** : बी (+), **गोत्र** : काश्यप, **रास** : सिंह, **नक्षत्र** : मघा, **चरण** : १, **नाडी** : अंत्य, **गण** : राक्षस, **शिक्षण** : मास्टर इन मायक्रोबायोलॉजी, **नोकरी/ व्यवसायः** खाजगी लॅब, **वार्षिक उत्पन्न** : ४ लाख २० हजार, **अपेक्षा** : पदवीधर, सुशील मुंबई, पुण्यात वास्तव्यअसणारा, **संपर्क** : ९६१९४१४०१२/ ९८२११५६३८१

✻ **वैदेही गणेश तारे (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख** : ०२/१०/१९९६, **जन्म वेळ** : सकाळी ०८.३५ **जन्म ठिकाण** : कल्याण, **उंची** : ५.६, **रक्तगट** : बी (+), **गोत्र** : अत्री, **रास** : वृषभ, **नक्षत्र** : रोहिणी, **चरण** : ३, **नाडी** : अंत्य, **गण** : मनुष्य, **शिक्षण** : बी.ई. कॉम्प्युटर सायंन्स, **नोकरी/ व्यवसायः** खाजगी, **वार्षिक उत्पन्न** : १४ लाख, **अपेक्षा** : अनुरूप, मुंबई, पुणे, परिसरातील असावा, वयातील अंतर २/३ वर्ष, मिथुन व धनु रास नको, **संपर्क** : ९२२४३४२९९१/९२२४३४०८९९

✻ **दर्शना विवेक भावे (देशस्थ यजुर्वेदी), जन्म तारीख** : १२/०३/१९९४, **जन्म वेळ** : दुपारी ३.२०, **जन्म ठिकाण** : संभाजी नगर, **उंची** : ५.१, **रक्तगट** : ए (+), **गोत्र** : भार्गव, **रास** : कूंभ, **नक्षत्र** : पूर्वा भाद्रपदा, **चरण** : ३, **नाडी** : आद्य, **गण** : मनुष्य, **शिक्षण** : बी.डी.एस. (डेंटिस्ट), **नोकरी/ व्यवसायः** सिद्धेश डेंटल क्लिनिक येथे असिस्टंट डॉक्टर, **मासिक उत्पन्न** : २०हजार ते २५हजार, **अपेक्षा** : निर्व्यसनी, शाकाहारी, हौशी, आरोग्यसंपन्न, सुसंस्कृत, जीवनमुल्ये जपणारा, प्राधान्येकरून वैद्यकीयक्षेत्र, **संपर्क** : ९८९२१७७०९६/९७०२७१८८५०

✻ **अंकीता प्रमोद परांडे (देशस्थ ब्रा२ण), जन्म तारीख** : ०२/१०/१९९७, **जन्म वेळ** : रात्री १०.४०, **जन्म ठिकाण** : अंबरनाथ, **उंची** : ५.२, **गोत्र** : बादरायण, **रास** : कन्या, **नक्षत्र** : चित्रा, **चरण** : २, **नाडी** : मध्य, **शिक्षण** : (एम एस क्लाऊड कम्प्युटींग) आयर लँड डबलिन, **नोकरी/ व्यवसायः** ॲमेझॉन प्रायव्हेट लिमिटेड, (आर्यलॅण्ड डबंलिन), **वार्षिक उत्पन्न** : ४८हजार युरो, **अपेक्षा** : अनुरूप, परदेशात असल्यास उत्तम, **संपर्क** : ८४५४८१७३२८/ ७८२३८३७६०६

✻ **भाग्यश्री माधव वाड (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख** : ०५/०७/१९९९, **जन्म वेळ** : सकाळी ६.५ **जन्म ठिकाण** : गिरगाव, **उंची** : ५.४, **रक्तगट** : ओ (+), **गोत्र** : कौशिक, **रास** : मीन, **नक्षत्र** : पूर्वाभाद्रपदा, **चरण** : ४, **नाडी** : आद्य, **गण** : मनुष्य, **शिक्षण** : बी.ई. कॉम्प्युटर सायंन्स, **नोकरी/ व्यवसायः** नाही, करण्याची तयारी, **वार्षिक उत्पन्न** : नाही, **अपेक्षा** : सुस्थापीत, पदवीधर, शुद्ध शाकाहारी,पुणे निवासी, वार्षिक उत्पन्न १० लाखावर हवे (तुळ, मकर, सिंह रास नको), **संपर्क** : ९६१९४५८८१२

✻ **मृणाल प्रमोद लळीत (देशस्थ), जन्म तारीख** : ०६.१०.२००१, **जन्म वेळ** : सायंकाळी ७.००, **जन्म ठिकाण** : चिपळूण, **उंची** : ५.२, **गोत्र** : कौशिक, **रास** : वृषभ, **नक्षत्र** : कृतिका, **चरण** : ३, **नाडी** : अंत्य, **गण** : राक्षस, **शिक्षण** :

बी कॉम, **अपेक्षा** : धर्मश्रद्धा संपन्न, सुदृढ, निर्व्यसनी, शाकाहारी, **संपर्क** : ८६६८३२१५७९ / ९४२११४६५०६

## वधू पाहिजे ........................................................................................

**⁕ सुजय विनोद ऋषी (देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख** : १२/०४/१९९३, **जन्म वेळ** : दुपारी १२.००, **जन्म ठिकाण** : मुंबई, **उंची** : ५.१०, **गोत्र** : भारव्दाज, **रास** : धनु, **नक्षत्र** : मूळ, **चरण** : ४, **नाडी** : आद्य, **गण** : राक्षस, **शिक्षण** : बी. कॉम. एम. कॉम फर्स्ट इयर, **नोकरी/ व्यवसायः** खाजगी क्लासेस, **वार्षिक उत्पन्न** : १० लाख, **अपेक्षा** : नोकरी करणारी, ब्राह्मण, अनुरूप, **संपर्क** : ९८१९३८२९५० / ९८१९३८२९५०

**⁕ ओंकार मिलिंद सौबलकर** (देवरूखे), **जन्म तारीख** : ०८/०२/१९९४, **जन्म वेळ** : सायंकाळी ७.०४, **जन्म ठिकाण** : डोंबिवली, **उंची** : ५.८, **रक्तगट** : बी (+), **गोत्र** : कौशिक, **रास** : मकर, **नक्षत्र** : उत्तरा, **नाडी** : अंत्य, **गण** : मनुष्य, **शिक्षण** : एम. कॉम.नेट / सेट , पी एच डी करत आहे, **नोकरी/ व्यवसायः** बिजनेस प्रोसेस टी सी एस(असिस्टंट मॅनेजर), **वार्षिक उत्पन्न** : ८.५ लाख, **अपेक्षा** : अनुरूप, उच्चशिक्षित, शुद्ध शाकाहारी, **संपर्क** : ८६५५६५५८१४ / ८९७६८८४१४५

**⁕ प्रथमेश शशांक गरगरे (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख** : ०९/०१/१९९३, **जन्म वेळ** : पहाटे ५.५० **जन्म ठिकाण** : मुंबई, **उंची** : ५.७, **रक्तगट** : ओ (+), **गोत्र** : भारव्दाज, **रास** : कूंभ, **नक्षत्र** : शततारका, **चरण** : १, **नाडी** : आद्य, **गण** : राक्षस, **शिक्षण** : बी.ई. प्रोडक्शन मॅनेजर, **नोकरी/ व्यवसायः** खाजगी (ठाणे, मुंबई), **वार्षिक उत्पन्न** : ६ लाख, **अपेक्षा** : पदवीधर, **संपर्क** : ९८६९४३५७२९

**⁕ अभिजित दिलीप वणकर (चित्पावन), जन्म तारीख** : २२/१०/२०००, **जन्म वेळ** : रात्री ९.४५ **जन्म ठिकाण** : टेटवली(रत्नागिरी), **उंची** : ५, **गोत्र** : काश्यप, **रास** : सिंह, **नक्षत्र** : मघा, **चरण** : २, **नाडी** : अंत्य, **गण** : राक्षस, **शिक्षण** : बारावी(नापास), **नोकरी/ व्यवसायः** व्यवसायशेतकरी, गाडी भाडयाने देणे, **वार्षिक उत्पन्न** : २० लाख, **अपेक्षा** : निदान दहावी पास असावी, शेती/गुरे/घरचे काम व्यवस्थित/(आई, वडील, बहिण)यांना सांभाळणारी असावी, **संपर्क** : ९६९९८२५६०२

**⁕ अभिष प्रशांत ठोसर (चित्पावन), जन्म तारीख** : ०१/०६/२०००, **जन्म वेळ** : सायंकाळी ७.२९, **जन्म ठिकाण** : बोर्ली पंचतन (रायगड), **उंची** : ५.५, **रक्तगट** : ओ (+), **गोत्र** : भारव्दाज, **रास** : मेष, **नक्षत्र** : हस्त, **चरण** : २, **नाडी** : अंत्य, **गण** : राक्षस, **शिक्षण** : दहावी, पशुवैद्य, **नोकरी/ व्यवसायः** स्वतःचा व्यवसाय, पशुवैद्य, **वार्षिक उत्पन्न** : ८ लाख, **अपेक्षा** : गावात राहणारी, सगळयांना सांभाळुन घेणारी, **संपर्क** : ९६५३४१५५०३ / ८०८७४१४३६७

**⁕ दिवाकर सतीश वैद्य (पारगांवकर) (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख** : ११/०९/१९९८, **जन्म वेळ** : सकाळी ८.१० **जन्म ठिकाण** : पुणे, **उंची** : ५.२, **रक्तगट** : बी (+), **गोत्र** : कपि, **रास** : मेष, **नक्षत्र** : कृतिका, **चरण** : १, **नाडी** : अंत्य, **गण** : राक्षस, **शिक्षण** : बी.ई. मेकॅनिकल(पुणे), **नोकरी/ व्यवसायः** धवल टेक्नॉलॉजी एल. एल. पी. मॅनेजर, **वार्षिक उत्पन्न** : ५लाख ७४हजार, **अपेक्षा** : जॉब करणारी, आई-वडीलांना संभाळणारी असावी, **संपर्क** : ९८५००९२७०५ / ९५२७३१६४२५

**⁕ देवेंद्र चंद्रकांत देशपांडे (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख** : १८/१२/१९९७, **जन्म वेळ** : दुपारी १.२८ **जन्म ठिकाण** : अंबरनाथ, **उंची** : ५.७, **रक्तगट** : ए (+), **गोत्र** : वत्स, **रास** : कर्क, **नक्षत्र** : आश्लेषा, **चरण** : ३, **नाडी** : अंत्य, **गण** : राक्षस, **शिक्षण : सी.एम.ए., बी.ए.एफ, नोकरी/ व्यवसायः** खाजगी (अंधेरी), **वार्षिक उत्पन्न** : ९लाख, **अपेक्षा** : सुसंस्कृत, उच्चशिक्षित, नोकरी आवश्यक(कोकणस्थ, यजुर्वेदी, चालेल), **संपर्क** : ७२७६६७८३८० / ९३७३३०९३८६

**⁕ रोहन जयंत डकारे (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख** : ०४/१०/१९९७, **जन्म वेळ** : रात्री ८.०० **जन्म ठिकाण** : बऱ्हाणपुर, **उंची** : ५.१०, **रक्तगट** : बी (+), **गोत्र** : वसिष्ठ, **रास** : तुळ, **नक्षत्र** : स्वाती, **चरण** : ४, **नाडी** : अंत्य, **गण** : देव, **शिक्षण** : बारावी (सायंन्स), **नोकरी/ व्यवसायः** पौरोहित्य(अंबरनाथ येथे), **वार्षिक उत्पन्न** : ४०हजार,

**अपेक्षा** : सुशिक्षित, उत्तम गृहीणी, **संपर्क** : ९६१९२६४६२१ / ८२६९८०९९८७

**※ सागर मंगेश जोशी (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख** : ०६/१२/१९९७, **जन्म वेळ** : सायंकाळी ४.५१ **जन्म ठिकाण** : बदलापुर, **उंची** : ५.१०, **गोत्र** : वशिष्ठ, **रास** : कुंभ, **नक्षत्र** : शततारका, **चरण** : २, **नाडी** : आद्य, **गण** : राक्षस, **शिक्षण** : १०वी पास, **नोकरी/ व्यवसाय**: पौरोहित्य, **मासिक उत्पन्न** : ४०हजार, **अपेक्षा** : अनुरूप, **संपर्क** : ९१३७८१८४८४

## (घटस्फोटित / पुर्नविवाह)

### वर पाहिजे ........................................................................

**※ तेजश्री चिंतामणी देव (देशस्थ ऋग्वेदी) (घटस्फोटित), जन्म तारीख** : १३/०४/१९९१, **जन्म वेळ** : सकाळी ०८.२५ **जन्म ठिकाण** : कल्याण, **उंची** : ५.४, **रक्तगट** : बी (+), **गोत्र** : हरीतस, **रास** : मीन, **नक्षत्र** : उत्तराभाद्रपदा, **चरण** : २, **नाडी** : मध्य, **गण** : मनुष्य, **शिक्षण** : एम बी ए फायनान्स, **नोकरी/ व्यवसाय**: खाजगी, **वार्षिक उत्पन्न** : ८ लाख, **अपेक्षा** : सुस्वभावी, मनमिळावु, आर्थिक दृष्टया सक्षम, निर्व्यसनी, विनाआपत्य, **संपर्क** : ९८७०३८६५५०


**※ दिव्या मिलिंद हरकरे (देशस्थ ऋग्वेदी) (घटस्फोटित), जन्म तारीख** : २१/१०/१९९५, **जन्म वेळ** : सकाळी ६.१०, **जन्म ठिकाण** : मुंबइ (दत्तक कन्या), **उंची** : ५.४, **रक्तगट** : ओ (+), **गोत्र** : कौशिक, **रास** : सिंह, **नक्षत्र** : पुर्वा, **नाडी** : अंत्य, **गण** : मनुष्य, **शिक्षण** : बी. ए., **नोकरी/ व्यवसाय**: ब्युटीशिअन (स्वतःचे सलोन), **वार्षिक उत्पन्न** : २ लाख ५० हजार, **अपेक्षा** : मुंबई, पुणे, नाशिक परिसरातील, नोकरी व्यवसायकरणारा, घटस्फोटित, विधुर, विनाआपत्य, (दत्तक असल्याने स्वीकार करण्याची तयारी हवी), **संपर्क** : ९३२२०३६४३२/९८३३८५६६६०

### वधू पाहिजे ........................................................................

**※ सुमीत सतीश कानडे (कोकणस्थ) (घटस्फोटित), जन्म तारीख** : २४/०१/१९८७, **जन्म वेळ** : सकाळी ९.४२ **जन्म ठिकाण** : विलेपार्ले(मुंबई), **उंची** : ५.१०, **गोत्र** : शांडिल्य, **रास** : तुळ, **नक्षत्र** : विशाखा, **चरण** : ४, **नाडी** : अंत्य, **गण** : राक्षस, **शिक्षण** : बी. कॉम. एम. बी.ए. फायनान्स, **नोकरी/ व्यवसाय**: खाजगी, **वार्षिक उत्पन्न** : २३लाख ५०हजार, **अपेक्षा** : अनुरूप, **संपर्क** : ९८३३३१७९५१ / ९७६९०१०७११

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील)**

# भावपूर्ण श्रद्धांजली



**माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी दिल्लीत दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी दुःखद निधन झाले. दि. २२ मे २००४ ते २६ मे २०१४ पर्यंत भारताचे पंतप्रधान होते.**



# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली**
**सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादा – माहीम विभागातील**

## खालील मंगल कार्यालये

– तळमजल्यावरील कै. राधाबाई कब्बूर वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह

– दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह.

### * वैशिष्ट्ये *

वधू–वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन
मंगल कार्य ठरतात प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा.
सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य–तालीम,
संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध

****

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई – ४०० ०१६.
दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadram@gmail.com


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com


मनपूर्वक आभार
SAMARTH
URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.
HEAD OFFICE: Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum. Ph.: 2431357
RC Nagar Branch: Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. Ph.: 2443161
Tilakwadi Branch: Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. Ph.: 2430357
Shahapur Branch: 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Ph.: 2431257
Khanapur Branch: 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road, Ph.: 6363090655
BEST SOCIETY AWARD WINNER
from Govt. of Karnataka
BEST SOCIETY AWARD
आज आम्ही आमच्या संस्थेचा 29 वा स्थापना दिवस साजरा करीत आहोत. तसेच सोसायटीला सहकार खात्याकडून बेळगावी जिल्हा उत्कृष्ट सहकारी संस्था पुरस्कार देऊन नुकतेच गौरविण्यात आले आहे. या यशस्वी वाटचालीत सहभागी असलेले आमचे सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, कर्मचारी वर्ग आणि हितचिंतक या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल त्या सर्वां बद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.
चेअरमन
ॲड. अजय ए. सुनाळकर
व्हा. चेअरमन
अभय व्ही. जोशी
संचालक मंडळ
गणपत ए. कुलकर्णी
विनायक जी. जोशी
प्रदीपकुमार जी. कुलकर्णी
अरविंद एस. कुलकर्णी
मालतेश जी. पाटील
सुनंदा सी. आळतेकर
छाया एन. जोशी
अनिल व्ही. भंडारी
उमेश सुणगार
परशुराम एम. कांबळे
अशोक एच. पुजेरी
राघवेंद्र एस. केसनूर
सेक्रेटरी
गौरी एस. बिडी
जन. मॅनेजर

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.



**समर्थ रामदास ११ वे वंशज व अधिकारी स्वामी आदरणीय**
**श्री भूषण स्वामी महाराज यांची कल्याण येथे भेट.**
**श्री रामदासस्वामी संस्थान, सज्जनगड तर्फे श्रीमंत ग्रंथराज दासबोध प्रसाद म्हणून मिळाला.**

Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH